• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक ३२२ • शुक्रवार,दि.२३ फेब्रुवारी २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये
• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 322 • Friday 23 Feb 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
|बीड | परभणी | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

# पर्यटन विकासासाठी ३८१ कोटी -मुख्यमंत्री

**मुंबई । वृत्तसेवा**

सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटनस्थळांच्या एकात्मिक विकासाकरिता पर्यटन विकास आराखड्यास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या शिखर समितीत मान्यता देण्यात आली. या आराखड्यासाठी सुमारे ३८१ कोटी रुपये मंजूर करण्यात आले असून श्री क्षेत्र महाबळेश्वर, प्रतापगड किल्ला जतन व संवर्धन, सह्याद्री व्याघ्र राखीव व वनक्षेत्रातील पर्यटन विकास व कोयना हेळवाक वन विभागांतर्गत कोयना नदी जलपर्यटनाचा समावेश आहे. मुनावळे येथे महिन्याभरात वॉटर स्पोर्टस सुरू करण्यात येणार असून नदीमध्ये मोठ्या प्रमाणावर वॉटर स्पोर्टस् असणारा हा पहिला प्रकल्प ठरणार असून त्यामुळे स्थानिकांना रोजगाराची मोठी संधी निर्माण होणार असल्याचेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. सह्याद्री अतिथीगृह येथे सातारा जिल्हा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा शिखर समितीची बैठक मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, साताऱ्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई, आमदार मकरंद पाटील, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरव विजय, पर्यटन विभागाच्या सचिव जयश्री भोज, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक श्रद्धा जोशी, उपस्थित होते. पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून



सहभागी झाले होते. सातारा जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी यावेळी विकास आराखड्याचे सादरीकरण केले. हा संपूर्ण परिसर निसर्गसंपन्न असून पर्यटनवृद्धीसाठी मोठी संधी आहे. याठिकाणी निसर्ग पर्यटन, दुर्गभ्रमंती, धार्मिक पर्यटनाबरोबरच वॉटर स्पोर्टस् देखील करता येणार असल्याने या आराखड्याची अंमलबजावणी जलदगतीने करावी. असे निर्देश देतानाच पर्यटन विकासाच्या दृष्टीने होणाऱ्या कामांमुळे स्थानिकांना रोजगार मिळणार असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

# शेतकरी आत्महत्या करतोय अन् गद्दार राजकारणात व्यस्त -ठाकरे

**मुंबई । वृत्तसेवा**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरेंनी राज्यभर दौऱ्यांना सुरुवात केली आहे. त्यानिमित्ताने ते आज बुलढाण्यात होते. बुलढण्यातील जनतेशी संवाद साधताना त्यांनी माता जिजाऊंचाही उल्लेख केला. तसंच, सत्ताधाऱ्यांची हुकुमशाही आणि एकाधिकारशाही उलथवून लावण्यासाठी एकत्र या, असं आवाहनही त्यांनी केलं. ते म्हणाले, महाराष्ट्राची जिद्द गेली कुठे? बुलढाणा आपण म्हणतो की सिंदखेड राजा म्हणजे जिजाऊंचं जन्मस्थान. जिजाऊंनी आपल्याला एवढं मोठं दैवत दिलं, त्यांना आपण विसरलो. अन्यायाविरोधात लढण्याची जिद्द ज्या



दैवताने दिली त्यांचं मातृस्थान या जिल्ह्यात आहे. आणि त्या जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्येला वळत असेल आणि गद्दार टिमकी वाजवत असेल तर बुलढणाकरांना तरी जिजाऊंचं नाव घेण्याची योग्यता नाही. जिजाऊलाही समाधान वाटलं पाहिजे की मी ज्या तेजाला जन्म दिला त्याचा प्रकाश संपूर्ण देशावर पडला. पण मी जिथे जन्मले तिथेच प्रकाश पडणार नसेल तर उपयोग काय माझ्या आयुष्याचा? कशाला म्हणायचं जय जिजाऊ. भाजपावाले जे म्हणताय की ते घराणेशाहीच्या विरुद्ध आहेत, पण आम्ही तुमच्या एकाधिकारशाही आणि हुकुमशाहीच्याविरोधात आहोत. मुख्यमंत्री पद म्हणजे बीसीसीआयचं अध्यक्षपद नाही की तुम्ही जसं तिथे जय शाहाला बसवलं. माझं घराणं अगदी प्रबोधनकारांपासून महाराष्ट्रासमोर आहे. अमित शाह, तुमचं असं क्रिकेटमधलं काय योगदान आहे? जय शाह विराट कोहलीचा प्रशिक्षक होता का? मुंबईमधील मॅच अहमदाबादला नेणं एवढंच त्याचं कर्तृत्व?, अशी टीकाही उद्धव ठाकरेंनी केली. अशोक चव्हाण, अजित पवार तिथे गेले. जुने काँग्रेसवाले पुन्हा हवे असतील तर भाजपाला मतदान करा, अशी काही टॅगलाईन आहे की काय. भाजपाला मतदान करा, जुने काँग्रेसवाले आमदार-खासदार करा. हा प्रश्न तुम्हाला सर्वांना विचारतो, ही लढाई माझ्या एकट्याची नाही.

# पत्रकार संरक्षण कायद्यासाठी मुंबईत बैठक संपन्न

**रायगड । वृत्तसेवा**

महाराष्ट्रात पत्रकार संरक्षण कायदा मंजूर करण्यात आला. मात्र त्याची अंमलबजावणी होणार नाही याची दक्षता घेत सरकारने कायद्याचं नोटिफिकेशन काढलंच नाही. त्यामुळं महाराष्ट्रात हा कायदाच अस्तित्वात आला नाही. महाराष्ट्रातील पत्रकारांची सरकारनं घोर फसवणूक केली. याची संतप्त प्रतिक्रिया माध्यम जगतात उमटली आहे. आज मुंबईत विविध पत्रकार संघटनांनी एकत्र येत यासंदर्भात संतप्त भावना व्यक्त केल्या. सरकारने तातडीने नोटिफिकेशन काढून पत्रकार संरक्षण कायदयाची अंमलबजावणी करावी अशी मागणी बैठकीत करण्यात आली. तसेच पुर्वी सरकारी पत्रकार संरक्षण समित्या होत्या त्या समित्यांचे पुनर्गठन करावे अशी मागणी यावेळी करण्यात आली. सरकारनं सर्व प्रमुख संघटनांची बैठक बोलावून पत्रकार संरक्षण कायदा लागू करावा अशी मागणी यावेळी करण्यात आली.. बैठकीस अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे एस.एम.देशमुख, किरण नाईक, शरद पाबळे, मिलिंद अष्टीवकर, गणेश मोकाशी, दीपक कैतके, राजा आदाटे, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र वाबळे, संदीप चव्हाण, राही भिडे,स्वाती घोसाळकर, मुंबई प्रेस क्लबचे अध्यक्ष गुरबीरसिंग, जतीन देसाई, टीव्हीजेएचे विनोद जगदाळे, बीयूजेचे इंदरकुमार जैन, क्राईम रिपोर्टर असोशिएशन विशाल सिंग, म्हाडा पत्रकार संघटनेचे दीपक पवार, राजेंद्र सालसकर, आदि उपस्थित होते..

# गोरक्षनाथ टेकडी येथे शनिवार रोजी कीर्तन

**बीड । प्रतिनिधी**

विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २६ व्या वर्षातील सहाव्या पुण्यतिथी



माघ शुद्ध. पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प. भागवताचार्य रामचंद्र महाराज जगताप माजलगाव यांचे शनिवार दिनांक २४ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व समस्त गावकरी मंडळी मन्यारवाडी ता. जि.बीड यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

# न्यू होम मिनिस्टर कार्यक्रमास महिला वर्गांची अलोट गर्दी

**आष्टी । प्रतिनिधी**

जामगावचे सरपंच राधेश्याम धस यांच्या वाढदिवसानिमित्त आष्टी येथे बुधवारी सायंकाळी पंचायत समितीच्या प्रांगणात महिलांसाठी हळदी कुंकू तसेच न्यू होम मिनिस्टर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी झालेल्या विविध खेळांच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक उषा केरुळकर द्वितीय क्रमांक नेहा हंबर्डे तर तृतिय क्रमांक सीमा जानापुरे यांनी पटकावला.प्रामुख्याने मनोरंजन व प्रश्नमंजुषा व विविध उपक्रमास महिला वर्गांची अलोट गर्दी कार्यक्रमाचा केंद्रबिंदू ठरला. धस यांच्या वाढदिवसाच्या अनुषंगाने महिला भगिनींसाठी खास 'खेळ



पैठणीचा खेळ मनोरंजनाचा' सिने अभिनेते निलेश पापत यांच्या न्यू होम मिनिस्टर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या वेळी महिलांनी तळ्यात मळ्यात,उखाणे,फुगा फोडणे,फॅशन शो या सह आदी स्पर्धेत आपला सहभाग नोंदविला.अभूतपूर्व उत्साही वातावरणात हा कार्यक्रम पार पडला. न्यू होम मिनिस्टर हा कार्यक्रम वाढदिवसानिमित्त ठेवल्याबद्दल हजारोच्या संख्येने आलेल्या महिलांनी विशेष: श्याम धस यांचे विशेष आभार मानले. आपल्या भावाकडे माहेरी आल्याचे भावनिक व सह्दयी बोलून दाखवत होम मिनिस्टर कार्यक्रमात सर्व महिलांनी सहभाग नोंदविला. श्याम धस यांच्या वाढदिवसानिमित्त शेकापुर येथील गोशाळेला ३ टन चारा देण्यात आला तर १२१ रक्तदात्यांनी रक्तदान केले.



**अंबाजोगाई - महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या सहायक प्राध्यापक- शरीरशास्त्र, महाराष्ट्र वैद्यकीय आणि संशोधन सेवा, गट-ब शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव येथे डॉ दीपक नागनाथराव कावळे यांची निवड झाल्याबद्दल अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देतांना अँड.रमेश धस,देविदास जाधव, संतोष केंद्रे आदी.**




# शेतकरी महासन्मान योजनेचा १७९२ कोटी निधी वितरणास मान्यता

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी राज्यातील सुमारे ९० लाख शेतकर्यांसाठी नमो शेतकरी महासन्मान योजनेच्या दुसर्या हप्त्यापोटी १७९२ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आला असून लाभार्थी शेतकर्यांच्या बँक खात्यावर हा निधी वितरित करण्यासाठी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. या संदर्भातील शासन निर्णय आज निर्गमित करण्यात आला आहे. या योजनेच्या दुसर्या हप्त्या द्वारे राज्यातील सुमारे ९० लाख शेतकर्यांच्या बँक खात्यांवर थेट प्रत्येकी दोन हजार रुपये याप्रमाणे रक्कम जमा करण्यात येईल. ही रक्कम फेब्रुवारी महिन्याच्या अखेरपर्यंत जमा



करण्यात येणार असल्याची माहिती धनंजय मुंडे यांनी दिली आहे. राज्य सरकारने केंद्र सरकारच्या पी एम किसान योजनेचा आदर्श घेऊन महाराष्ट्र राज्यात नमो शेतकरी महासन्मान योजना सुरू केली. या अंतर्गत प्रत्येक वर्षात पीएम किसान च्या सोबतीला नमो शेतकरी महासन्मान योजनेतून देखील लाभार्थी शेतकर्यांना प्रति वर्ष सहा हजार याप्रमाणे रक्कम या योजनेतून देण्यात येत आहे. एप्रिल ते जुलै २०२३ या पहिल्या हप्त्यामध्ये १७२० कोटी रुपये निधीचे राज्यातील सुमारे ८६ लाख शेतकर्यांच्या खात्यावर थेट वितरण करण्यात आले होते. त्यानंतर ऑगस्ट ते नोव्हेंबर २०२३ या दुसर्या हप्त्यासाठी आता १७९२ कोटी रुपये निधी वितरित करण्यात आला असून याचा लाभ राज्यातील जवळपास ९० लाख शेतकर्यांना मिळणार असून या महिना अखेर पर्यंत या निधीचे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती धनंजय मुंडे यांनी दिली आहे. राज्यात नमो शेतकरी महा सन्मान योजनेची घोषणा झाल्यानंतर धनंजय मुंडे यांनी एक विशेष मोहीम राबवली या अंतर्गत या योजनेसाठी पात्र असूनही काही तांत्रिक अडचणीमुळे वंचित राहिलेल्या लाभार्थी शेतकर्यांच्या कागदपत्रांची व त्रुटींची पूर्तता करण्यात आली यामुळे राज्यात लाभार्थी शेतकर्यांच्या संख्येत सुमारे १३ लाख शेतकर्यांची वाढ झाली आहे.

संपादकीय

# निवडणूक प्रक्रिया पारदर्शक व्हावी

निवडणूक प्रक्रियेत काळ्या पैशाचा वाढता वापर विचारात घेऊन त्याला चाप बसविण्यासाठी इलेक्ट्रोरल बाँडची व्यवस्था हे एक सुधारणात्मक पाऊल होते. याच सरकारच्या कार्यकाळात यासंदर्भातील कायदा तयार करण्यात आला होता; पण इलेक्ट्रोरल बाँडसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने नोंदवलेले आक्षेप आणि निर्देश याचे आकलन करत विद्यमान सरकारला आगामी काळात सुधारित व्यवस्था आणण्याचा विचार करावा लागेल. इलेक्ट्रोरल बाँडसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय कायदेशीर प्रक्रियेतून आला असून, त्यावर विशेष भाष्य करण्याचे कारण नाही. परंतु, या निर्णयाच्या निमित्ताने सर्वांनाच विचार करण्यास भाग पाडणारी गोष्ट म्हणजे इलेक्ट्रोरल बाँडची व्यवस्था कशामुळे अस्तित्वात आली. ती आणण्यामागचा काय हेतू? राजकीय पक्षांना देणगी मिळवण्याचा अधिकार आहे आणि यावर त्यांना कोणताही प्राप्तिकर भरावा लागत नाही. देणगीच्या रूपातून मिळणार्या पैशाची निवडणूक आयोगाला माहिती द्यावी, एवढीच अपेक्षा असते. पूर्वी धनादेश किंवा ड्राफ्टच्या माध्यमातून पैसे मिळत असत आणि त्याची माहितीही आयोगापर्यंत जात असे. मात्र, रोख देणगीच्या बाबतीत पारदर्शकता अजिबातच पाळली जात नव्हती. आपल्याकडे अनेक वर्षांपासून राजकारणात आणि निवडणूक प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात काळा पैसा वापरला जातो आणि ही बाब अर्थातच सर्वश्रूत आहे. त्याचवेळी त्यावर तोडगा काढण्यावरही बरीच चर्चा आणि खल झालेला आहे. दुसरीकडे, काळा पैसा देणारी मंडळी राजकीय पक्ष आणि त्यांच्या सरकारकडून वेळोवेळी लाभ उचलत राहिली आहे. हे चित्र राजकीय व्यवस्थेला मोठे आव्हान देणारे आहे. या पार्श्वभूमीवर इलेक्ट्रोरल बाँडची व्यवस्था आणली. काळा पैसा रोखला जावा आणि त्याचे उच्चाटन व्हावे, असा यामागचा उद्देश होता. सर्वोच्च न्यायालयाचा आक्षेप मुळातच पारदर्शकतेवरून आहे. इलेक्ट्रोरल बाँड येण्यापूर्वी राजकीय पक्ष ज्यारीतीने पैसे गोळा करत होते, त्यात पारदर्शकता नव्हती. त्याचवेळी जी मंडळी रोखीने देणगी देत होती त्यांच्या पैशाचा स्रोत काय होता? त्याचाही शोध घेणे कठीण होते. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करत इलेक्ट्रोरल बाँडची व्यवस्था सुरू ठेवली, तर कदाचित न्यायालयाला कोणताही आक्षेप नसेल. आपल्या देशात नोंदणीकृत राजकीय पक्षांची संख्या शेकड्यांनी आहे. अशावेळी देणगी गोळा करण्याचे एकच माध्यम ठेवणे आणि त्यानंतर निधीचे समान वाटप करणे ही बाब शक्य नाही. प्रत्येक पक्षाची विचारसरणी वेगळी आहे. मला एखाद्या पक्षाला देणगी द्यायची असेल आणि एखाद्या पक्षाची विचारसरणी मला पटत नसेल किंवा त्याची भूमिका, कार्यक्रम देशाला नुकसानकारक असेल, तर त्या पक्षाला देणगी देण्याची इच्छा राहणार नाही. सर्वच पक्षांना सारखाच निधीवाटप झाला, तर पक्ष स्थापन करणे हा एकप्रकारचा व्यवसायच होईल. अशा स्थितीत कोणत्या पक्षाला देणगी द्यायची आहे, ही बाब संबंधित व्यक्ती किंवा संस्थेवर अवलंबून असेल. निवडणूक प्रक्रियेत देणगी देण्याचे माध्यम रोखीने असू नये, असे अनेकांचे मत आहे आणि त्या मताशी मीदेखील सहमत आहे. स्रोतांची माहिती देणार्या व्यक्तींकडूनच देणगी स्वीकारण्याची व्यवस्था असायला हवी. एखाद्या पक्षाला एखाद्या व्यक्तीने किंवा संस्थेने किती रक्कम दिली आहे, याबाबतची माहिती देणे कायदेशीररीत्या योग्य आहे. सर्वोच्च न्यायालयाला अशीच व्यवस्था अभिप्रेत असेल, तर त्याकडे सकारात्मक पाहिले पाहिजे. आजही प्रत्येक निवडणुकीच्या काळात आयोग कारवाईच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात काळा पैसा पकडतो. हा पैसा बाहेरून येण्याची शक्यताही नाकारता येत नाही आणि तसे आयोगाने अनेकदा म्हटलेही आहे. देशाच्या लोकशाही प्रक्रियेत भ्रष्टाचार, काळा पैसा, बळाचा वापर होऊ नये आणि स्वच्छ व पारदर्शक, निष्पक्षपणे निवडणुका पार पडाव्यात, हाच उद्देश व्यवस्थेचा आणि नियमांचा असतो.

## केज पंचायत समिती कार्यालय येथे कायदे विषयक शिबीर

**केज । प्रतिनिधी**

केज पंचायत समिती कार्यालयाच्या सभागृहात कायदे विषयक जनजागरण शिबीर दि.२० फेब्रुवारी २०२४ रोजी तालुका विधी सेवा समिती व वकीलसंघ केज यांच्या संयुक्त विद्यमाने कायदे विषयक जन जागृती शिबीराचे आयोजन करण्यात आले होते, सदरचे शिबिर पंचायत समिती केज येथे दुपारी ०२-०० वाजता आयोजित करण्यात आले होते. दरम्यान, या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी केज न्यायालयाचे सहदिवाणी न्यायाधीश श्री.एन.डी. गोळे तिसरे सह दिवाणी न्यायाधीश श्रीमती ए.टी जगताप मॅडम होत्या. या कार्यक्रमास सहाय्यक गटविकास अधिकारी श्रीमती सविता शेप, विस्तार अधिकारी काशीद सर, शिक्षण विस्तार अधिकारी श्री. चाटे सर, विधीज्ञ सर्वश्री डी.टी. सपाटे, एस.व्ही. मिसळे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्र संचालन एस. व्ही. मिसळे यांनी केले. जनजागृती शिबीर कार्यक्रमाची प्रस्तावना डी.टी. सपाटे यांनी केली. यावेळी डी.टी. सपाटे यांनी महाराष्ट्र सार्वजनिक सेवा हक्क अधिनियम या विषयावर विस्तृत अशी माहिती सांगितली. तिसरे सह दिवाणी न्यायाधीश श्रीमती ए.टी. जगताप यांनी जागतिक सामाजिक न्याय दिन या विषयावरसविस्तर असे मार्गदर्शन केले. त्या बोलताना म्हणाल्या की, जगभरात २० फेब्रुवारी हा दिवस जागतिक सामाजिकन्याय दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिवशी धर्म, जात, लिंग इत्यादी विविध आधारावर विभागलेल्या लोकांना एकत्र करण्याचा प्रयत्न जातो. सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी अनेक तरतूद करण्यात आल्या असून त्या आधारे अनेक कायदेही करण्यात आले असल्याचे त्या म्हणाल्या.

# महाविकास आघाडीचे जागा वाटप अंतिम टप्प्यात

**मुंबई । वृत्तसेवा**

आगामी काळात होत असलेल्या लोकसभा निवडणुकीची तयारी सर्वच पक्ष तयारी करीत आहेत. महाविकास आघाडी व महायुतीच्या घटक पक्षात जागावाटपाची चर्चा सुरू आहे. यामध्ये सध्या तरी महाविकास आघाडीने बाजी मारली असल्याचे चित्र आहे. येत्या चार दिवसांत मविआचे जागावाटप फायनल होणार आहे. लोकसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडी एकत्रितपणे सामोरे जाणार आहे. महाविकास आघाडीची सातत्याने चर्चा होत असून, जागावाटप अंतिम टप्प्यात आले आहे. जागावाटपावरून मविआत कोणतेही मतभेद नाहीत. काँग्रेस राज्य निवड मंडळाच्या बैठकीनंतर २७ व २८ फेब्रुवारीला मविआची बैठक होत आहे, त्या बैठकीत जागावाटपाचा अंतिम निर्णय होईल, अशी माहिती प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी दिली. राज्य निवड मंडळाच्या बैठकीआधी प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. महाराष्ट्रात मविआ आघाडी मजबूत आहे, आम्ही एकत्रपणे निवडणुका लढवत जास्तीत जास्त जागा जिंकण्याचा प्रयत्न करत आहोत. सर्व मित्र पक्षांशी सातत्याने चर्चा सुरू आहे. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांच्याशी चर्चा झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार , शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे , आंबेडकर यांच्याशी चर्चा करत आहेत. प्रकाश आंबेडकर यांनी दिलेल्या सर्व मुद्द्यांवर सहमती झाली आहे. काँग्रेस पक्ष लोकसभा निवडणुकीसाठी सज्ज आहे, लोणावळा येथे दोन दिवसांचे प्रशिक्षण शिबिर झाले. या शिबिरात संघटन मजबुत करण्याविषयी चर्चा झाली आहे, मुंबई काँग्रेसच्या तयारीचा आढावाही घेतला जात असल्याचे रमेश चेन्नीथला यांनी स्पष्ट केले. निवडणुका आल्यामुळे विरोधी पक्षांच्या मंडळींवर सरकारी यंत्रणांच्या माध्यमातून धाडी टाकल्या जात आहेत. परंतु भाजपच्या एकाही भ्रष्ट नेत्यावर कारवाई केली जात नाही. भ्रष्टाचारमुक्त भारत करण्याची वल्गना भारतीय जनता पक्षाने केली होती. परंतु, ज्या लोकांवर भाजपने भ्रष्टाचाराचे आरोप केले त्यांनाच भाजपमध्ये घेऊन भ्रष्टाचारयुक्त भाजप केला आहे. अजित पवार यांच्यावर ७० हजार कोटी रुपयांच्या घोटाळ्याचा आरोप केला, त्यांच्यावर छापे टाकले का? उलट त्यांना सत्तेत घेऊन उपमुख्यमंत्री केले, अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली.

## नागपूर विद्यापीठाचे डॉ.चौधरींच्या अडचणीत वाढ?

**नागपूर । वृत्तसेवा**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे डॉ. चौधरी यांना राज्यपाल रमेश बैस यांनी पदावरून निलंबित केल्यानंतर आता पुन्हा डॉ. चौधरी यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता बळावली आहे. कारण, डॉ. चौधरी यांनी केलेले भ्रष्टाचाराचे प्रकरण बघता त्याच्या सीआयडी चौकशीची मागणी सिनेट सदस्यांकडून करण्यात आली आहे. डॉ. चौधरी यांच्याविरोधात राज्यपाल कार्यालयाकडे अनेक तक्रारी होत्या. राज्यपालांनी या तक्रारींवर बाजू मांडण्यासाठी बुधवार २१ फेब्रुवारीला कुलगुरूंना बोलावले होते. मात्र, डॉ. चौधरींच्या उत्तराने राज्यपाल कार्यालयाचे समाधान न झाल्याने त्यांनी निलंबनाची कारवाई केली आहे. डॉ.चौधरी यांच्या विरोधातील तक्रारींच्या चौकशीसाठी नेमण्यात आलेल्या उच्च तंत्र शिक्षण विभागाचे उपसचिव अजित बाविस्कर यांच्या समितीने आपला अहवाल राज्यपालांना दिला होता. या अहवालात कुलगुरूंकडून अधिकारांचा दुरुपयोग झाल्याचे, शासनाचे 'एमकेसीएल' संदर्भात आदेश असताना त्याची अवहेलना करण्यात आल्याचे ताशेरे ओढण्यात आले होते.

## शिवजन्मोत्सव निमित्त नाईकवाडे यांचे किर्तन संपन्न

**बीड । प्रतिनिधी**


तालुक्यातील लिंबागणेश येथे दरवर्षी सालाबादप्रमाणे विश्ववंदनीय छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा विविध सामाजिक उपक्रमांद्वारे साजरा करण्यात आला.दि.२१ बुधवार रोजी रात्री शिवव्याख्याते ह.भ.प. सुशेन महाराज नाईकवाडे यांचे शिवचरित्रपर सुश्राव्य किर्तन झाले.किर्तनात छत्रपती शिवरायांच्या कार्याची सविस्तर ओळख करून देत असताना शिवाजी महाराजांनी समाजहिताचे व लोक कल्याणकारी कार्य करून स्वराज्याचे स्वप्न साकार केले. सर्व समाज घटकांना सोबत घेऊन राज्य कारभार केला. शिवरायांचा प्रेरणादायी आदर्श तरुणांनी आचरणात आणला पाहिजे.व्यासनाधीतेमुळे बरबाद होत असलेली तरूणाई कुटुंब आणि समाजासाठी घातक ठरत आहे.सार्वजनिक शिवजन्मोत्सव लिंबागणेश येथील युवकांनी रक्तदान आदि सामाजिक उपक्रमांद्वारे शिवजन्मोत्सव साजरा करत असल्याबद्दल कौतुक केले. यावेळी बेलेश्वर संस्थान मठाधिपती शांतीब्रम्ह तुकाराम महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी लिंबागणेश,पिंपरी,पोखरी,बेलगाव येथील पांडुरंग वाणी, बाजीराव दशमे,शिवहारी कोटुळे, बाबुराव वाणी, गणपत घोलप,अनंतकाका मुळे, विनायक मोरे, सतिश शिंदे भजनी मंडळ यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिवजन्मोत्सव सोहळा कमिटीची कार्यकारीणी अध्यक्ष महावीर वाणी, उपाध्यक्ष तुकाराम गायकवाड, सचिव विक्रांत वाणी, कोषाध्यक्ष दिनेश जाधव, सहसचिव अभिजित गायकवाड,शहादेव धलपे,अक्षय नाईकवाडे, संतोष वाणी,अक्षय ढवळे,अमित घोलप, सुभाष वाणी,अभय वनवे, पत्रकार हरिओम क्षीरसागर यांनी परिश्रम घेतले.

# जाणीव चॅरिटेबल ट्रस्ट

पालघर जिल्ह्यातील आदिवासी पाड्यातील सकवार या जिल्हा परिषद शाळेत जाणीव चॅरिटेबल ट्रस्टने शिक्षणाची गाडी आली या उपक्रमाअंतर्गत बाल-कला आणि क्रीडा महोत्सव २०२३-२४चे आयोजन केले होते. आदिवासी पाड्यातील विद्यार्थ्यांना शाळेची ओढ लागावी तसेच शिक्षणाचे महत्त्व समजावे हाच या उपक्रमाचा मुख्य हेतू होता. दिनांक ९ आणि १० फेब्रुवारी अशा दोन दिवसीय उपक्रमात पहिल्या दिवशी सकाळी शालेय विद्यार्थ्यांच्या अल्पोहारानंतर उद्घाटन समारंभ पार पडला. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र परब, प्रशासकीय व्यवस्थापक सुनील पाठक, शाळेचे मुख्याध्यापक आनंद राऊत, माजी शिक्षक जलाराम भोंगे, साठये महाविद्यालयाच्या (स्वायत्त) राष्ट्रीय सेवा योजनेचे (एनएसएस) कार्यक्रम अधिकारी श्री. बोंबे, माजी सहाय्यक प्राचार्य साठ्ये महाविद्यालय तथा राष्ट्रीय सेवा योजना विभागीय समन्वयक मुंबई विभाग महाराष्ट्र अधिक दोन स्तर चे विनोद गवारे, सकवार ग्रामपंचायतचे सदस्य आणि इतर मान्यवरांच्या हस्ते स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून सुरूवात करण्यात आली. रामचंद्र परब यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना शिक्षणाचे तसेच खेळाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व स्पष्ट केले तर सुनील पाठक यांनी क्रीडा महोत्सवाच्या अटी व नियम स्पष्ट करत विद्यार्थ्यांना खिलाडूवृत्ती जपण्याची शपथ दिली. यानंतर विनोद गवारे यांच्या हस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलित करून शिक्षणाची गाडी आली अशी उद्घोषणा करत आदिवासी पाड्यावर शैक्षणिक आणि सामाजिक जनजागृती पर रॅली काढण्यात आली. सदर महोत्सवात क्रिकेट, खो-खो, कबड्डी, लंगडी या मैदानी खेळांसोबतच कॅरम, बुद्धिबळ, हस्ताक्षर, नृत्य अशा विद्यार्थ्यांमधील सुप्तगुणांना वाव देणाऱ्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. शाळेतील १९८ विद्यार्थ्यांसोबतच ४० माजी विद्यार्थी आणि वीटभट्टीवर काम करणाऱ्या स्थलांतरित कामगारांच्या २८ पाल्यांनी सहभाग नोंदवला होता. सदर उपक्रमास साठये महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या ४५ स्वयंसेवकांनी देखील सहाय्य केले होते. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, खेळाचे साहित्य तसेच खाऊचे वाटप करण्यात आले. यात प्रामुख्याने दोन चॅम्पियन कॅरम बोर्ड आणि क्रिकेट संच, दोन मॅग्नेटिक बुद्धिबळाचे संच, दोन बॅडमिंटनचे संच, विशेष लहान वयोगटातील मुलांच्या बैठ्या खेळाचे साहित्य तसेच शैक्षणिक साहित्यांचे वाटप करण्यात आले. दुसऱ्या दिवशी उर्वरित खेळांचे सामने तसेच पारंपारिक तारफा आणि इतर गाण्यांवर नृत्य सादर करत सांस्कृतिक कार्यक्रम शाळेच्या पटांगणात पार पडला. यानंतर जाणीव चॅरिटेबल ट्रस्टच्या ट्रस्टी आरती पाठक, अजित सातोसे, ॲड. मयूर जोशी आणि साठये महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी श्यामला गवारे, संदीप कदम या मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. सदर उपक्रमासाठी जाणीव चॅरिटेबल ट्रस्टला साईंन पोस्ट इंडिया या कंपनी तर्फे सीएसआर फंड मधून आर्थिक मदत करण्यात आली होती. या कंपनीचे वरिष्ठ प्रतिनिधी अमर नडगिरी यांनी देखील कार्यक्रमास विशेष उपस्थिती दर्शवली. त्यासोबतच अनेकांच्या आर्थिक सहाय्यातून हा कार्यक्रम उभा राहिला. कार्यक्रमास ७८ वर्षांच्या माजी शिक्षिका आशालता घाणेकर यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. आदिवासी पाड्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेतील मुख्याध्यापकांसह सर्व शिक्षकांनी आणि ग्रामस्थांनी दिलेल्या सहकार्यामुळेच हा कार्यक्रम यथासांग पार पडला. यापुढेही असेच शैक्षणिक, सामाजिक आणि लोकउपयोगी उपक्रम दुर्लक्षित सामाजिक घटकांसाठी करत राहू अशी ग्वाही जाणीव चॅरिटेबल ट्रस्टच्या ट्रस्टी आणि स्वयंसेवक गणेश मराळ, नुपूर गोसावी, वैष्णवी परब, यश चकोर, स्वप्निल पाठक, ध्रुव कडारा, राजेंद्रकुमार घाणेकर, त्रिवेणी नडगिरी, यश पवार यांनी दिली.

# अज्ञान, अस्वच्छता आणि अंधश्रद्धेचे निर्मूलनकर्ते संत गाडगे महाराज

अमरावती जिल्ह्यात शेणगांव नावाच्या छोट्या खेडे गावात २३ फेब्रुवारी, १८७६ रोजी झिंगराजी व सखुबाई जाणोरकर यांच्या उदरी डेबूजी उर्फ संत गाडगे बाबा यांचा जन्म झाला. त्यांचे कुटुंब शेतकरी होते. वडिलांना मद्य-मांसाचे व्यसन जडले, व्यसनापायी त्यांचा मृत्यू झाला. या वेळी डेबूजी अगदी लहान होते. या घटनेचा बाल डेबूजीच्या मनावर फार मोठा परिणाम झाला. १८९२ साली लग्न झाले. संसारात त्यांचे मन फार काळ रमले नाही, दि. १ फेब्रुवारी, १९०५ रोजी त्यांनी घरादाराचा त्याग करून संन्यास स्वीकारला. तिर्थाटन केले, अनेक ठिकाणी भ्रमण केले. लोकसेवेचे व्रत धरले, कोणी अडचणीत सापडलेला असेल तर त्याला मदत केली, एका हातात खराटा, दुसऱ्या हातात एक फुटके गाडगे, डोक्यावर झिंज्या, त्यावर खापराच्या तुकड्याची टोपी, एका कानात कवडी, तर दुसर्या कानात फुटक्या बांगडीची काच, अंगावर गोधडीवजा फाटके-तुटके कपडे असा त्यांचा साधा वेष होता. लोक त्यांना 'गाडगेबाबा' म्हणत. ते ज्या गावात जात तो गाव झाडून स्वच्छ करीत. आयुष्यभर त्यांनी आळस, अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी-परंपरा, व्यसनाधीनता, कर्जबाजारीपणा यांना विरोध केला. धर्माच्या नावाखाली होत असलेला अन्याय, अत्याचार, अनीती दूर करण्यासाठी प्रयत्न केले. यामुळे संत गाडगेबाबा हे संत मालिकेतील 'शिरोमणी' म्हणून ओळखले जातात. लोक त्यांना 'गोधडे बुवा', 'चिंधे बुवा', 'लोटके महाराज' आदी नावांनी संबोधित असत. तर संत गाडगे महाराजांना आचार्य प्र. के. अत्रे 'खराट्याचा बादशहा' , डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'गरीबांचा कैवारी', राष्ट्रसंत तुकडोजी महाराज 'मानवतेचा मूर्तिमंत आदर्श', उद्धव रसाळे 'मानवतेचे पुजारी', मधुकर केचे 'माणुसकीचे चालते-बोलते विद्यापीठ' म्हणत. तर काहीलोक त्यांना 'निष्काम सेवाभावाचा मूर्तीमंत महामेरू' म्हणजेच 'सद्गुरु गाडगे महाराज' असे संबोधत . बाबा केवळ बोलके सुधारक नव्हते तर कृतीशील सुधारक होते. त्यांनी इ.स. १९०८ मध्ये पुर्णा नदीवर घाट निर्माण केला, इ.स.१९२५ मध्ये मुर्तीजापूर येथे गोरक्षण, धर्मशाळा व विद्यालयाची स्थापना केली, इ.स.१९१७ मध्ये पंढरपूर येथे चोखामेळा धर्मशाळा निर्माण केली, इ.स.१९३१ मध्ये वरवंडे येथे गाडगेबाबांच्या प्रबोधनातून पशुहत्या बंद झाली, इ.स. १९३२ मध्ये ऋणमोचन येते 'सदावर्त' सुरू केले. पुढे ८ फेब्रुवारी, १९५२ रोजी 'श्री गाडगेबाबा मिशन' स्थापन करून महाराष्ट्रभर



शिक्षणसंथा व धर्मशाळा स्थापन केल्या, इ.स. १९५४ मध्ये जे.जे. हॉस्पिटल, मुंबई येथे धर्मशाळा बांधली. संत गाडगे बाबांनी हा समाज अधोगतीला जाऊ नये, म्हणून स्वतः हाती झाडू घेऊन आयुष्यभर अज्ञान, अंधश्रद्धा आणि अस्वच्छता या त्रिसूत्राचा अंगीकार केला, याशिवाय आधुनिक समाज घडवण्यासाठी अनेक विषयांवर अत्यंत साध्या सोप्या भाषेत कीर्तनातून समाजप्रबोधन केले. बाबा कीर्तनातून सांगत, 'शिक्षणाविणा मनुष्य म्हणजे धोंडा', मायबापहो. 'घरात दोन ताट असतील तर एक ताट विका, हातावर भाकरी खा, लुगडं कमी पैशाचं घ्या, पण लेकराईले शिक्षण दिल्या बिगर राहू नका' 'चौऱ्याऐंशी रोगांवर शिक्षण हा एकमेव रामबाण उपाय आहे. अशिक्षित माणसात व जनावरात काही फरक नाही. अशिक्षित, अज्ञानी माणसाला सावकार बुडवतो, सरकारी नोकर दरडावतो, लबाड लोक बडवतात, तुम्हाला स्वाभिमानाने जीवन जगावयाचे असेल तर माझ्या मायबापांनो शिक्षण घ्या. मुलांना शाळेत पाठवा. तुम्ही शाळेत शिकता ती खरी विद्या. तिने माणसाला माणूसपणच काय पण देवपण सुद्धा येते'. शिक्षणामुळे मानवाचा, समाजाचा उद्धार होतो. गाडगेबाबांच्या हातात लेखणी नसली तरी काळजाला भिडणारे अनुभवाचे शब्द होते, ते निरक्षर होते, तरीपण निरक्षरता दूर करण्यासाठी लोकांनी देणगी दिलेल्या पैशातून अनाथ लोकांसाठी, रंजल्या-गांजल्यांसाठी महाराष्ट्रातील प्रमुख शहरात व तीर्थक्षेत्री धर्मशाळा, आश्रमशाळा, नद्यांना घाट, पाणपोई, गोरक्षण, अंध-अपंगांसाठी अनाथश्रम, मुलांसाठी शाळा-कॉलेज व वसतिगृहे बांधून सर्वसामान्य गरीब जनतेची राहण्याची सोय केली. बाबा दीन-दुबळे, अनाथ यांच्यात देव पाहत, आणि या देवाची सेवा करण्यात रममान होत. त्याच बरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील आणि डॉ. पंजाबराव देशमुख यांना बाबांनी मदत केली. तळागाळातील मुले शिकली तर त्यांना चांगल्या पद्धतीने जगता येईल, या विचाराने बाबांनी शिक्षणाला महत्त्व दिले. शिकलेला मनुष्य अंधश्रद्धेच्या, रूढीपरंपरेच्या आहारी जाणार नाही, तो बुद्धिवादी होईल. सुखी होईल व इतरांना सुखी करण्याचा प्रयत्न करेल, हा बाबांचा आशावाद होता. त्यांना शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे साधन आहे, हे उमगले होते. गाडगेबाबांनी पूर्ण जबाबदारीने हाती झाडू घेवून ते अनवाणी पायांनी शेकडो कि.मी. फिरले, गावोगावी जात, दिवसा गलिच्छ, अस्वच्छ गावे झाडून लख्ख व चकचकीत करीत. रात्री बाबा कीर्तन करत, कीर्तनाला हजारो लोक येत. ते कीर्तनातून स्वच्छतेचे महत्त्व पटवून देत, झाडूची थोरवी गात. अरं, अशी कशी रं तुमी माणसं ! अरं, मांजर, कुत्रंसुद्धा आपल्या घाणीवर माती ओढतं, आणि तुमी माणसं. खुशाल तशीच बसता. काय म्हणावं तुमाला ? हातातल्या झाडूने बाबा गाव मैदान साफ करीत, तर विचाराच्या केरसुणीने मनावरची जळमटे झटकून टाकत. अशा प्रकारचे अंतर्बाह्य शुद्धीचे महान कार्य चालत असे. या खराटाधर्माने त्यांनी 'सार्वजनिक आरोग्य' आणि 'श्रमप्रतिष्ठा' या दोन मुल्यांची जोपासना केली. सार्वजनिक स्वच्छता हाच गाडगेबाबांच्या कार्याचा केंद्रबिंदू होता. महात्मा गांधींनी 'चरख्यातून स्वराज्य' दर्शवले, तसे गाडगेबाबांनी 'खराट्यातून सुराज्य' सांगितले. रस्त्यावर खिचपत पडलेल्या कुष्ठरोग्याची ते सेवा करीत, बाबा दुःखीतांचे, स्वच्छतेचे संत होते. गाडगेबाबांचा झाडू आज देशात स्वच्छतेचे प्रतीक बनला आहे. हाच झाडू वा खराटा आज राष्ट्र अभियानाचे आणि अभिमानाचे प्रतिक बनला आहे. गाडगेबाबांनी अंधश्रद्धा निर्मूलनासाठी ५० वर्षे काम केले, परंतू ते लोकांचा नमस्कार ही स्वीकारत नसत. 'माझा कुणी शिष्य नाही, मी कुणाचा गुरु नाही'. असे मानत. समाधी, साक्षात्कार, शकुन-अपशकुन, अंगारी-धुपारा आई, पीर नवस-सायस आणि दोरी-गंडा आदी गोष्टींना त्यांच्याजवळ थारा नव्हता. गाडगेबाबा कीर्तनात संत कबीरांचे दोहे आणि संत तुकारामांचे अभंग यांचा आधार घेत, धर्माच्या नावाने चालणाऱ्या कर्मकांडाचा समाचार घेत. सावकारशाहीला विरोध करत. बाबा म्हणत, कर्ज काढू नका, कर्जकाढून श्राद्ध, तेरावा, नवस, सण साजरे करू नका, तीर्थस्थळी जाऊ नका. देवभोळेपणावर शरसंधान साधत. थोतांडावर प्रहार करत. त्यांनी माणसाला खऱ्या धर्माची जाणीव करून दिली. 'गोपाला, गोपाला, देवकीनंदन गोपाला' या गजराने ते सारा परिसर दुमदुमून टाकत. गाडगे महाराजांनी कीर्तनांद्वारे लोकजागृतीचा मार्ग अवलंबला. म्हणून आचार्य प्र. के. अत्रे गाडगेबाबांबद्दल म्हणतात, 'सिंहाला पाहावे वनात, हत्तीला पाहावे रानात, तर गाडगेबाबांना पाहावे कीर्तनात'. भूतदया त्यांच्या धर्माचा कणा होता, जीवहत्या त्यांना अमान्य होती. असा कसा तुमचा देव । घेतो बकऱ्याचा जीव । देव-देवतांना बोकड बळी देता, आपल्या जिभेचे चोचले पुरविण्यासाठी प्रसाद म्हणून मांसाहार करायचा, अशा आपमतलबी रूढीविरुद्ध त्यांनी बंड उभारले. जागर केला. ज्योतिषांनी कुणाचे भले झाले नाही. जुन्या रूढी, परंपरा आणि अंधश्रद्धांतून लोकांना बाहेर काढून त्यांना विज्ञानवादी बनवणे, हा बाबांचा मुख्य उद्देश होता. दीनदुबळ्यांची सेवा हे गाडगेबाबांच्या जीवनाचे व्रत बनले होते. त्यासाठी त्यांनी खरा मानवतावादी धर्म सांगितला, 'भुकेल्यांना अन्न, तहानलेल्यांना पाणी, उघड्या नागड्यांना वस्त्र, गरीब मुलामुलींना शिक्षणाची मदत, बेघरांना निवारा, रोग्यांना औषधोपचार, बेकारांना रोजगार, पशुपक्षी मुक्या प्राण्यांना अभय, गरीब तरुण तरुणींचे लग्न, दुःखी व निराशांना हिंमत' हा मानवी कल्याणाचा संदेश संत गाडगेबाबांनी आपल्याला दिला. त्यांच्या जयंतीच्या दिवशी आपण ही मानवीधर्माची मुल्ये अंगीकारत अज्ञान, अस्वच्छता आणि अंधश्रद्धा यांना तिलांजली दिली पाहिजे, तेव्हाच बाबांना अपेक्षित असणारा समाज निर्माण होईल.

– डॉ.खेत्री

# विद्यापीठासाठी भरघोस निधी मिळणार

**संभाजीनगर । वृत्तसेवा**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा आता कायापालट होणार आहे. मागील वर्षी ऑगस्ट महिन्यात विद्यापीठाने पायाभूत सुविधांसह संशोधनासाठी तब्बल १२० कोटी रुपयांच्या निधीची पीएम-उषा योजनेंतर्गत मागणी केली होती. त्यात १०० कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी मिळाली आहे. त्याशिवाय विद्यापीठाचे घटक महाविद्यालय असलेल्या घनसावंगी येथील मॉडेल कॉलेजलाही ४ कोटी रुपये मिळाले आहेत. केंद्र शासनाने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शैक्षणिक संस्थांच्या विकासासाठी केंद्रीय शिक्षण विभागांतर्गत प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (पीएम-उषा) राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार राज्यांच्या उच्च शिक्षण विभागामार्फत विद्यापीठ, महाविद्यालयांकडून पायाभूत सुविधा आणि संशोधनासाठी प्रस्ताव मागविले होते. निधीसाठीचा प्रस्ताव बनविण्यासाठी तत्कालीन कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांनी दहा सदस्यांची समिती नेमली होती. समितीने विद्यापीठातील विभागप्रमुख व उपकेंद्रातील ४८ विभागांकडून प्रस्ताव मागविले होते. यातून डॉ. येवलेंच्या नेतृत्वात रुसा सेल व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख डॉ. गुलाब खेडकर यांनी १२० कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार केला. याचे सादरीकरण ३१ ऑगस्ट २०२३ रोजी मुंबईत झालेल्या बैठकीत राज्य शासनाकडे केले. शासनाच्या मंजुरीनंतर केंद्रीय शिक्षण मंत्रालयातील उच्च शिक्षण विभागांतर्गत 'प्रोजेक्ट प्रूव्हल बोर्ड'ची (पीएबी) मागील महिन्यात बैठक झाली. त्या बैठकीत विद्यापीठाला १०० कोटी व मॉडेल कॉलेजला ४ कोटींचा निधी मंजूर केला. विद्यापीठाला मिळणाऱ्या १०० कोटी रुपयांमध्ये ४० कोटी रुपये पायाभूत सुविधा व बांधकामासाठी असतील. त्याशिवाय वैज्ञानिक उपकरणांच्या खरेदीसाठी ३० कोटी, रिनोव्हेशन ण्ड अपग्रेडेशनसाठी २० कोटी आणि विविध प्रशिक्षणासाठी १० कोटी रुपये खर्च होतील. पहिल्या टप्प्यात विद्यापीठास ६५, दुसऱ्यात ३० आणि तिसऱ्यात ५ कोटी मिळतील. विद्यमान कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांनी १०० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्यामुळे रविवारी सुटीच्या दिवशी प्रस्तावाचा आढावा घेतला. बैठकीला प्रकुलगुरू डॉ. वाल्मीक सरवदे, रुसा सेल व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख डॉ. गुलाब खेडकर व प्रभारी कुलसचिव डॉ. प्रशांत अमृतकर यांची उपस्थिती होती.

# लातूर शहरात वाहनासह १८ लाखांचा गुटखा पकडला

**लातूर । वृत्तसेवा**

चोरट्या मार्गाने गुटख्याची वाहतूक करणाऱ्या दोघांना लातुरातील कव्हा नाका परिसरात स्थागुशाच्या पथकाने बुधवारी अटक केली. त्यांच्याकडून वाहनासह तब्बल १८ लाखांचा गुटखा जप्त केला असून, याबाबत विवेकानंद चौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी सांगितले, लातूर शहरात चोरट्या मार्गाने वाहनातून गुटख्याची वाहतूक केली जात असल्याची माहिती खबऱ्याने पोलिस अधीक्षक सोमय मुंडे यांना दिली.

या माहितीची खातरजमा करून, त्यांनी कारवाईचे आदेश दिले. या माहितीनुसार लातुरातील कव्हा नाका परिसरात स्थागुशाच्या पथकाने बुधवारी सापळा लावला. गुटख्याची वाहतूक करणाऱ्या वाहनाला ताब्यात घेत झाडाझडती घेतली असता, त्यात विविध कंपनीचा प्रतिबंधित असलेला गुटखा आणि सुगंधित पानमसाला (किंमत ११ लाख ४१ हजार ८७२ रुपये) आणि गुन्ह्यातील स्कॉर्पिओ वाहन (किंमत सहा लाख रुपये) असा एकूण १७ लाख ४२ हजार ८७२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यावेळी उमर इस्माईल शेख (वय ३४) आणि शेख आफताब मेहमूद (वय ३८ दोघेही रा. खोरी गल्ली, लातूर) यांना अटक केली आहे. याबाबत विवेकानंद चौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक सोमय मुंडे, अप्पर पोलिस अधीक्ष डॉ. अजय देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संजीवन मिरकले, सपोनि. कांबळे यांच्या पथकाने केली.

# परभणीत कॉपीमुक्त अभियानाचा फज्जा

**परभणी । वृत्तसेवा**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने बुधवारपासून बारावीची परीक्षा घेण्यात येत आहे. यासाठी जिल्ह्यात ६९ परीक्षा केंद्राचे नियोजन करण्यात आले आहे. पहिल्याच दिवशी इंग्रजी पेपरसाठी २६५६७ विद्यार्थी बसणार होते. त्यापैकी २५६१४ जणांनी हा पेपर दिला. मात्र गंगाखेड तालुक्यातील इसाद येथील बालाजी कनिष्ठ महाविद्यालयाच्या सेंटरवर तब्बल २० विद्यार्थ्यांना कॉपी करताना पकडण्यात आले. त्यामळे या केंद्रावरील कर्मचाऱ्यावर नव्या नियमानुसार कारवाई होणार का? असा सवाल उपस्थित होत आहे. गत काही वर्षांपासून राज्यभरात कॉपीमुक्त अभियान प्रभावीपणे राबविण्यात येत आहे; मात्र जिल्ह्यात त्याचा फज्जा उडत असल्याने यंदा जिल्हा प्रशासनाने कठोर पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे. यात प्रामुख्याने दहावी, बारावी परीक्षेदरम्यान ज्या केंद्रावर कॉपी प्रकरणे आढळून येतील, त्या ठिकाणचे पर्यवेक्षक, केंद्रचालक तसेच बैठ्या पथकातील कर्मचाऱ्यांची एक वेतनवाढ बंद करण्याचा निर्णय सोमवारी झालेल्या बैठकीत घेण्यात आला होता. या निर्णयामुळे बारावीसह दहावीच्या परीक्षेत कॉपीमुक्त अभियानाला एका प्रकारे बळ मिळणार असल्याचे दिसून येत होते. मात्र बुधवारपासून शिक्षण मंडळाच्या वतीने जिल्ह्यातील ६९ केंद्रांवर परीक्षा घेण्याचे नियोजन करण्यात आले होते. त्यामुळे बुधवारी विद्यार्थ्यांनी केंद्राबाहेर सकाळी ९.३० पासूनच गर्दी केली होती. विद्यार्थ्यांची गैरसोय टाळली जावी, म्हणून अनेक केंद्रावर त्यांना वेळेपूर्वीच वर्गात प्रवेश देण्यात आला. जिल्ह्यातील ६९ केंद्रावर २६ हजार ५६७ पैकी २५ हजार ६१४ विद्यार्थ्यांनी इंग्रजीचा पेपर दिला. यावेळी परीक्षा केंद्रावर बैठे पथकासह भरारी पथके शिक्षण मंडळाच्या वतीने स्थापन करण्यात आली आहेत. मात्र गंगाखेड तालुक्यातील इसाद येथील श्री बालाजी कनिष्ठ महाविद्यालयाच्या सेंटरवर तब्बल २० विद्यार्थ्यांना कॉपी करताना पकडण्यात आले. त्यामळे परीक्षेच्या पहिल्याच दिवशी जिल्ह्यात कॉपीमुक्त आभियानाचा फज्जा उडाला आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने बुधवारपासून बारावीची परीक्षा घेण्यात येत आहे. यासाठी जिल्ह्यात ६९ परीक्षा केंद्राचे नियोजन करण्यात आले आहे. पहिल्याच दिवशी इंग्रजी पेपरसाठी २६५६७ विद्यार्थी बसणार होते. त्यापैकी २५६१४ जणांनी हा पेपर दिला असून, पहिल्याच दिवशी ९५३ विद्यार्थ्यांनी दांडी मारल्याचे शिक्षण विभागाने दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद करण्यात आले आहे. कॉपीमुक्त अभियान सक्षमपणे राबविण्यासाठी जिल्हा प्रशासनाने कडक पावले उचलली. जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाचे उपशिक्षणाधिकारी यांच्या पथकासह विविध पथके नियुक्त करण्यात आली. त्यात प्रामुख्याने उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, गटशिक्षण अधिकारी यांच्यासह आदी भरारी पथके परीक्षा केंद्रांना वारंवार भेट देत कॉफी मुक्त अभियान राबविण्यासाठी प्रयत्न करत आहेत. परंतु, दुसरीकडे गंगाखेड तालुक्यातील ९६ शिक्षकांची पर्यवेक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. परंतु, त्यांनी आपले कर्तव्य बजावले नसल्याचे पुढे आले. कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी गटशिक्षणाधिकारी यांनी या ९६ शिक्षकांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

# भ्रष्ट नेत्यांना भाजपाकडूनच सुरक्षाकवच

**मुंबई । वृत्तसेवा**

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरून भाजपावर घणाघाती टीका केली आहे. भ्रष्टाचारमुक्त भारत करण्याची वल्गना भारतीय जनता पक्षाने केली होती परंतु ज्या लोकांवर भाजपाने भ्रष्टाचाराचे आरोप केले त्यांनाच भाजपात घेऊन भ्रष्टाचारयुक्त भाजपा केला आहे, असा टोला नाना पटोले यांनी लगावला आहे. म्हणाले की, निवडणुका आल्यामुळे विरोधी पक्षांच्या लोकांवर सरकारी यंत्रणांच्या माध्यमातून धाडी टाकल्या जात आहेत. परंतु भाजपाच्या एकाही भ्रष्ट नेत्यावर कारवाई केली जात नाही. भ्रष्टाचारमुक्त भारत करण्याची वल्गना भारतीय जनता पक्षाने केली होती परंतु ज्या लोकांवर भाजपाने भ्रष्टाचाराचे आरोप केले त्यांनाच भाजपात घेऊन भ्रष्टाचारयुक्त भाजपा केला आहे. अजित पवार यांच्यावर ७० हजार कोटी रुपयांच्या घोटाळ्याचा आरोप केला त्यांच्यावर छापे टाकले का? उलट त्यांना सत्तेत घेऊन उपमुख्यमंत्री केले. आदर्श घोटाळ्याचा उल्लेख पंतप्रधान मोदींनी संसदेत केला व त्यानंतर अशोक चव्हाणांना भाजपात घेऊन राज्यसभा खासदार केले. भाजपाने भ्रष्टाचारी लोकांनी सुरक्षाकवच दिले आहे. भारतीय जनता पक्षाच्या ३०३ खासदारांमध्ये विरोधी पक्षातातील ज्या १६५ जण आहेत तर काँग्रेसचे ६७ जण आहेत, ज्यांच्यावर भाजपने भ्रष्टाचाराचे आरोप केले होते. हे काय भ्रष्टाचारमुक्त भारत करणार? असा सवाल नाना पटोले यांनी केला आहे. लोकसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडी एकत्रीतपणे सामोरे जाणार आहे. महाविकास आघाडीची सातत्याने चर्चा होत असून जागा वाटप अंतिम टप्प्यात आले आहे. जागा वाटपावरून मविआत कोणतेही मतभेद नाहीत. काँग्रेस राज्य निवड मंडळाच्या बैठकीनंतर २७ व २८ फेब्रुवारीला मविआची बैठक होत आहे, त्या बैठकीत जागा वाटपाचा अंतिम निर्णय होईल, अशी माहिती प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी दिली आहे. राज्य निवड मंडळाच्या बैठकीआधी प्रसार माध्यमांशी बोलताना प्रभारी रमेश चेन्नीथला म्हणाले की, महाराष्ट्रात मविआ आघाडी मजबूत आहे, आम्ही एकत्रपणे निवडणुका लढवत जास्तीत जास्त जागा जिंकण्याचा प्रयत्न करत आहोत. सर्व मित्र पक्षांशी सातत्याने चर्चा सुरु आहे. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांच्याशी चर्चा झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार व शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आंबेडकर यांच्याशी चर्चा करत आहेत. प्रकाश आंबेडकर यांनी दिलेल्या सर्व मुद्द्यांवर सहमती झालेली आहे. काँग्रेस पक्ष लोकसभा निवडणुकीसाठी सज्ज आहे, लोणावळा येथे दोन दिवसांचे प्रशिक्षण शिबिर झाले. या शिबिरात संघटन मजबुत करण्याविषयी चर्चा झाली आहे, मुंबई काँग्रेसच्या तयारीचा आढावाही घेतला जात आहे.

# गाडी पेट्रोल टाकून जाळण्याचा प्रयत्न

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते राम खाडे यांची गाडी पेट्रोल टाकून जाळण्याची घटना दि.२१ रोजी मध्यरात्री घडली असून संपूर्ण घटनाक्रम सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे.पो.नि.संतोष खेतमाळस यांची घटनास्थळाची पाहणी केली असुन सीसीटीव्ही फुटेज पोलिसांनी त्यांच्याकडे घेतले आहेत. सामाजिक कार्यकर्ते रामभाऊ खाडे यांचे स्कार्पिओ वाहन क्र.चक२३-ड३०४४ क-हेवडगांव येथील राहत्या घरी पार्क केलेली असताना अज्ञात ४ व्यक्तींनी २२ फेब्रुवारी २०२४ रोजी १ वाजुन २० मिनीटे५१ सेकंदाने तोंडाला रुमाल बांधून आलेल्या चौघांनी गाडीवरती ज्वलनशील पदार्थ टाकून पेटवून देण्याचा प्रयत्न केला व जाताना गाडीच्या काचेवर दगड फेकून मारल्याने आवाज झाला व त्यांचे बंधू जागे झाले असता मोठी आग लगलेली होती.मग सर्वच कुटुंब जागे झाले व या आगीवर पाणी टाकून नियत्रणात आणली, तोपर्यंत दुचाकीवरून आलेल्या चौघांनी पोबारा केला होता. हि संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया आष्टी पोलीस ठाण्यात सुरू आहे.

# बोगस बचत गटाद्वारे स्वस्त धान्य दुकान

**पुणे । वृत्तसेवा**



स्थानिक बचत गटाला रेशनिंग दुकान चालू करण्यामध्ये प्राधान्य असताना वाणेवाडी (ता. बारामती) येथे महसूल व पुरवठा विभागाच्या वरदहस्ताने एक बोगस बचत गट तब्बल सहा वर्षे रेशनिंग दुकान चालवत होते. ग्रामस्थांच्या आक्षेपानंतर हे दुकान तात्पुरते बंद करण्यात आले. मात्र, आता किरकोळ कारवाई करून पुन्हा रेशनिंग दुकान सुरू करण्यास परवानगी दिल्याने ग्रामस्थ संतप्त झाले आहेत. याबाबत ग्रामस्थ स्वप्निल चांदगुडे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाला निवेदन देत संबंधित बचत गटाची चौकशी करण्याची मागणी केली आहे. वाणेवाडीत मागील सहा वर्षांपासून समृद्धी महिला बचत गटाअंतर्गत स्वस्त धान्य दुकानदार अमोल वाईकर हे दुकान चालवीत होते. वाईकर हे बारामती येथील रहिवासी आहेत. ज्या समृद्धी महिला बचत गटाअंतर्गत दुकान चालविले जाते तो गटच बोगस आहे. त्यांनी स्वस्त धान्य दुकानाचा परवाना घेताना बोगस कागदपत्रे शासनास सादर करून शासनाची फसवणूक केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. वाणेवाडी गावामध्ये १५० पेक्षा जास्त महिला बचत गट कार्यरत असतानाही दुसर्या गावातील वाईकर हे तालुक्यात चार स्वस्त धान्य दुकाने वेगवेगळ्या ठिकाणी चालवीत असून, वाणेवाडीसह अन्य तीन दुकानांचीही चौकशी करण्याची मागणी केली आहे. समृद्धी गटाच्या कागदोपत्री अध्यक्षा शकुंतला बहीरमल असून, सोमेश्वरनगर येथील जिल्हा बँकेत समृद्धी बचत गटाचे असलेल्या खात्याला मात्र सुजाता बहीरमल या अध्यक्षा दिसत आहेत. या गटाबाबत आक्षेप घेतल्यानंतर मंडलाधिकार्यांनी तपासणी करीत दुकानावर ताशेरे ओढले. जिल्हा पुरवठा अधिकार्यांनी त्या गटाची अनामत रक्कम जप्त केली. मात्र, गटाच्या वतीने दुकान पुन्हा सुरू करण्यास धक्कादायकरीत्या परवानगी दिल्याने ग्रामस्थ संतप्त झाले आहेत. समृद्धी महिला बचत गटाचे सर्व सदस्य, दुकानचालक, बोगस कागदपत्रे देणारे महसूलचे अधिकारी व करंजेचे तलाठी यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी स्वप्निल चांदगुडे यांनी केली आहे. आमची सगळी कागदपत्रे योग्य असल्यामुळेच आम्हाला दुकानाचा परवाना मिळाला आहे. अनामत रक्कम जप्त करण्याचा आदेश जिल्हा पुरवठा अधिकार्यांनी दिला होता. मात्र, पुन्हा दुकान सुरू करण्यास त्यांनी परवानगी दिली. कुठलीही कागदपत्रे बोगस नाहीत.

# बारावीच्या पहिल्याच इंग्रजीचा पेपरला पकडले १५ कॉपीबहाद्दर

**नगर । वृत्तसेवा**

जिल्ह्यातील ११० केंद्रांवर बारावीची परीक्षा उत्साहात आणि तणावमुक्त वातावरणात सुरू झाली आहे. इंग्रजीचा पहिलाच पेपर होता. ६४ हजार परीक्षार्थींनी हा पेपर दिला. तर ९२१ जणांची गैरहजेरी दिसली. दरम्यान, शहरातील काही केंद्रांवर परीक्षार्थींनी प्रवेश करताच त्यांचे गुलाबपुष्प देवून स्वागत करण्यात आल्याचे दिसले. अवघड इंग्रजीचा पेपर सोपा गेल्यानंतर काही केंद्रांवर पेपर संपल्यानंतर परीक्षार्थींनी हुश्श केल्याचे दिसले. आज गुरुवारी हिंदीचा पेपर होणार आहे. जिल्ह्यातील ६४ हजार विद्यार्थी १२ वीची परीक्षा देत आहेत. ११० केंद्रांवर बैठक व्यवस्था करण्यात आलेली आहे. जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी कॉपीमुक्त परीक्षेसाठी प्रशासनाला सक्त सूचना केल्या आहेत. त्यानुसार शिक्षणाधिकारी कडूस यांनी तशी प्रत्येक केंद्रांवर व्यवस्था आणि उपाययोजनाही केल्याचे दिसले. जिल्ह्यात संवेदनशील १८ केंद्रावर पोलिसांचा फौजफाटाही तैनात होता. तसेच कॉपीमुक्त परीक्षेसाठी सात भरारी पथकेही वेगवेगळ्या परीक्षा केंद्रांना भेटी देताना दिसले. तहसीलदार, गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांचेही पथके परीक्षा केंद्रांची पाहणी करताना दिसले. दरम्यान, इंग्रजीचा पेपर असल्याने कॉपी करणार्या १५ परीक्षार्थींवर कारवाई करण्यात आली. कर्जत, जामखेड आणि पाथर्डी तालुक्यातील प्रत्येक पाच परीक्षार्थींवर ही कारवाई झाली आहे. यामध्ये शिक्षणाधिकारी कडूस यांनी कर्जत आणि जामखेडमध्ये स्वतः १० कॉपीकेस केल्या. तर 'योजना'चे शिक्षणाधिकारी संजय सरवदे यांनी पाथर्डीत पाच कारवाया केल्या आहेत. दरम्यान, परीक्षा सुरू होण्यापूर्वी शहरातील रेसिडेन्शीयलसह अन्य काही विद्यालयांनी परीक्षार्थींचे गुलाबपुष्प देवून स्वागत केले. त्यामुळे परीक्षार्थींच्या चेहर्यावरही उत्साह दिसून आला. तर पेपर संपल्यानंतर बाहेर आल्यानंतर परीक्षार्थींनी झाला एकदाचा इंगजीचा पेपर, असे म्हणत सुस्कारा सोडल्याचे दिसले.

# नागपूरात माजी नगरसेवकावर दहा अज्ञातांकडून जीवघेणा हल्ला

**नागपूर । वृत्तसेवा**

जिल्ह्यातील कामठी भागात एका माजी नगरसेवकावर आठ ते दहा अज्ञात लोकांनी जीवघेणा हल्ला केला आहे. या लोकांनी तलवार, हॉकी स्टिक आणि लाकडी दंडुक्याने हा हल्ला केल्याचे समजते. हल्ला झालेल्या माजी नगरसेवकाचे नाव दिलीप बांडेबुचे असून ते या हल्ल्यात गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर कामठी येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहे. आठ ते दहा अज्ञात लोकांचा जीवघेणा हल्ला पोलिसांनी दिलेल्या माहितीप्रमाणे दिलीप बांडेबुचे बुधवारी रात्री त्यांची जिम बंद करून अकरा वाजताच्या सुमारास नेहरूनगर भागातून जात असताना, त्यांच्यावर आठ ते दहा अज्ञात लोकांनी तलवार, हॉकी स्टिक आणि लाकडी दांडक्याने हल्ला केला. अज्ञात लोकांनी केलेल्या जबर मारहाणीत दिलीप बांडेबुचे गंभीर जखमी झाले आहेत. हल्ल्याच्या वेळेस झालेला आरडाओरडा ऐकून परिसरातील नागरिक घराबाहेर निघाल्यामुळे दिलीप बांडेबुचे यांचा जीव वाचला आहे. पोलिसांनी या प्रकरणी हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करून आरोपींचा शोध सुरू केला आहे. संपूर्ण घटना सीसीटीव्ही मध्ये चित्रीत झाली आहे.

# इंडस्ट्रीजला भीषण आग

**नागपूर। वृत्तसेवा**

बेसा परिसरातील वैद्य इंडस्ट्रीजला बुधवारी रात्री अकराच्या सुमारास लागलेल्या भीषण आगीत मोठी हानी झाल्याची माहिती आहे. दोन दिवसापूर्वी खरबी शक्ती माता नगर परिसरात दोन सिलेंडरचा स्फोट होऊन मंडप डेकोरेशनच्या दुकानाला आग लागली होती. तीन दिवसात शहरात मोठी आगीची ही दुसरी घटना आहे. बेसा रोडवर स्वामिधामच्या पुढे घोगलीकडे जात असताना रस्त्याच्या कडेला हे वैद्य इंडस्ट्रीज असून ही आग नेमकी कशामुळे लागली याचे कारण रात्री उशिरापर्यंत कळू शकले नाही. आग विझविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत.दरम्यान ,घटनास्थळी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी,छायाचित्रकारांशी स्थानिकांकडून गैरवर्तन करण्यात आल्याचे या घटनेनंतर पुढे आले.

# भाजपापासून घटक पक्ष दूर होतायेत

**नागपूर । वृत्तसेवा**

आम्ही भाजपासोबत होतो तेव्हा आमचे प्राबल्य होते, त्यापेक्षा दुप्पट प्राबल्य आता वाढलेले आहे. त्यावेळी माझे २३ नगरसेवक होते. आता माझ्याकडे ९८ नगरसेवक आणि जिल्हा परिषद सदस्य आहे. भाजपा मित्रपक्षाचा, छोट्या पक्षाचा वापर करते आणि फेकून देते हे त्यांचे जुने धोरण आहे. मला राजू शेट्टी, रामदास आठवले यांना भाजपाने जवळ केले. परंतु मोठे नेते आल्यानंतर त्यांना छोट्या माणसांची गरज राहत नाही अशी नाराजी माजी मंत्री आणि रासप प्रमुख महादेव जानकर यांनी व्यक्त केली आहे. महायुतीतील घटकपक्ष असलेल्या रासपाचे प्रमुख महादेव जानकर म्हणाले की, भाजपा आणि काँग्रेस दोन्हीही छोट्या पक्षांचा वापर करतात. लोकसभा निवडणुकीत आमची ताकद त्यांना कळेल. छोटा पक्षही मोठ्या पक्षाचा जीव घेऊ शकतो हे कालांतराने भाजपाला जाणीव होईल. आज आमची ताकद वाढलेली आहे. भाजपा-काँग्रेस महल आहे. आम्ही झोपडीतून आता बंगल्यात आलोय. महाराष्ट्रातील ७२ हजार पोलिंग बुथवर आम्ही सक्रीय आहोत. आमची ताकद वाढवण्यासाठी अहोरात्र मी फिरतोय असं त्यांनी सांगितले. तसेच नागपूर, चंद्रपूर दौरा झाला. राज्यात विविध ठिकाणी दौरे सुरू आहेत. आम्ही हळूहळू भाजपाचा जो आधार आहे तो बाजूला करण्याचं प्लॅनिंग शिस्तबद्ध पद्धतीने करत चाललोय. आज जरी भाजपाची मोठ्या प्रमाणात सत्ता असली तरी आम्ही २० वर्षापूर्वी दगड उभा केला तरी काँग्रेस निवडून येत होते. तेव्हा आम्ही काँग्रेसविरोधात लढत होतो. काँग्रेसला माणूस मिळणार नाही असं म्हणत होतो. आज तीच काँग्रेसची व्यथा आहे. त्यामुळे जनतेच्या मनातील भाजपा कशी विस्मृतीत जाईल यासाठी लागणारी भूमिका रासप घेईल असा इशारा महादेव जानकर यांनी दिला. दरम्यान, बारामती ही माझी युद्धभूमी आहे. जर मी इतर मतदारसंघात उभा राहिलो असतो तर मला जास्त कुणी विचारले नसते. बारामतीच्या जनतेच्या मनात महादेव जानकर आणि राष्ट्रीय समाज पक्ष उभा आहे. सुप्रिया सुळे असेल किंवा सुनेत्रा पवार असेल ज्याच्या पारड्यात राष्ट्रीय समाज पक्षाची ताकद जाईल तोच बारामतीचा खासदार बनेल असा विश्वास महादेव जानकर यांनी व्यक्त केला.

# बळीराजा कृषी विज्ञान मंडळ शेतकरी उद्योग कंपनी शेतकऱ्यांसाठी वरदान -माजी मंत्री जयदत्तअण्णा

**बीड । प्रतिनिधी**

बळीराजा कृषी विज्ञान मंडळ आणि क्रिएटिव शेतकरी उद्योग कंपनी बीड जिल्ह्यातीलच नव्हे तर मराठवाड्यातील शेतकर्यांसाठी वरदान असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले. बीड तालुक्यातील बोरखेड येथून जवळ असलेल्या वडवाडी येथील बळीराजा कृषी विज्ञान मंडळ व क्रिएटिव्ह शेतकरी उद्योग कंपनी या ठिकाणी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी भेट देऊन पाहणी केली यावेळी ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज मंझेरीकर, दिनकर कदम, नानासाहेब काकडे, बाबूसेठ लोढा, दादासाहेब मुंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, या प्रकल्पाला भेट देण्याची इच्छा होती अभिमान अवचार यांनी विस्ताराने प्रकल्पाला पुढे नेण्याचा प्रयत्न करून हाती घेतलेले काम पूर्ण केले आहे. एखादे काम पूर्णत्वाला नेण्यासाठी जिद्द, चिकाटी लागते एकाच छताखाली विविध उद्योग उभारून संशोधन प्रशिक्षण आणि प्रक्रिया असे चांगले उपक्रम अभिमान यांनी यशस्वीपणे चालू ठेवले आहेत. बीड जिल्ह्यात डोंगराळ भागात मोठ्या प्रमाणात सिताफळ उत्पादन होते पण हवा तसा मोबदला मिळत नाही. प्रक्रियेला, मार्केटिंगला खूप महत्त्व आहे पारंपारिक पद्धतीने शेती केली जाते पण आता नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून शेती उत्पादनात वाढ होऊ लागली आहे. आता नफ्यातील शेती कशी करावी यावर देखील उत्तम संशोधन झाले आहे. जो प्रयत्न करतो तो आकाशाला गवसणी घालतो. अभिमान



अवचार यांनी अभिमान वाटावा असाच हा उपक्रम आणि प्रगती केली असल्याचे ते म्हणाले. यावेळी प्रास्ताविकात बोलताना ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज म्हणाले की, बीड जिल्ह्याचे आधारवड असलेले नेतृत्व म्हणजे जयदत्त आण्णा असून २००६ पासून अभिमान अवचार यांनी हा उपक्रम सुरू केला आहे. आण्णा पालकमंत्री असतानाच आम्हाला खूप मोठे सहकार्य मिळाले आहे. प्रकल्पासाठी जमीन उपलब्ध झाली. माळरानावर भव्यदिव्य असे शेतकर्यांसाठी मार्गदर्शक असा उपक्रम या ठिकाणी उभारला गेला आहे. २००९ ला गावात दूध संघ सुरू केला, आजही पाचशे लिटर दूध संकलन होत असून बीड जिल्ह्यातील पहिली फार्मर प्रोड्युसर कंपनी या ठिकाणी उभारली गेली आहे. १००० सभासद असलेल्या कंपनीतून शेतकर्यांना लाभ मिळतो आहे या प्रकल्पात शेतकर्यांना निवासी प्रशिक्षण दिले जाते. गोशाळा, माती परीक्षण, उदबत्ती उत्पादन, तेल उत्पादन, सेंद्रिय खत निर्मिती अशी वेगवेगळे युनिट एकाच ठिकाणी उभारले असून भाजीपाला व सीताफळ प्रक्रिया हे दोन प्रकल्प लवकरच सुरू होणार आहेत. जिल्ह्यात अशा प्रकल्पांना चालना आणि शक्ती देण्याचे काम जयदत्त आण्णा करत असल्याचे ते म्हणाले. या पाहणी दरम्यान बाळासाहेब गोरे, संपतराव काळे, बाळासाहेब गावडे, अंगद शिंदे, अरूण साठे, महादेव सुरवसे, बाळासाहेब मोरे, कैलास येडे, लिंबाजीराव जाधव, मुकूंद काळे यांच्यासह कंपनीचे सर्व संचालक, गावातील नागरिक उपस्थित होते.

# बीड जिल्ह्यातील ५७ गावांमध्ये जलयुक्त शिवार योजनेचे विशेष काम -मुंडे

**परळी । प्रतिनिधी**

राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी आज अध्यात्मिक गुरु तसेच आर्ट ऑफ लिव्हिंग या संस्थेच्या माध्यमातून कृषी व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे श्री श्री रविशंकर यांची बंगळूर येथे भेट घेतली. जलयुक्त शिवार २.० ही योजना महाराष्ट्रात राबविण्यासाठी कृषी विभाग महाराष्ट्र शासन व आर्ट ऑफ लिव्हिंग संस्थेच्या मध्ये करार करण्यात आलेला आहे. गुरुवर्य श्री श्री रविशंकर यांचे अध्यात्मिक क्षेत्रासह कृषी व सामाजिक क्षेत्रातील योगदान अलौकिक आहे. नैसर्गिक शेतीचा त्यांनी घेतलेला ध्यास व त्यातून उभारलेले कार्य आज संपूर्ण देशात पोचले आहे. त्यामुळे त्यांच्या या कार्याचा राज्यात देखील नक्कीच फायदा होईल, असे मत यावेळी धनंजय मुंडे यांनी व्यक्त केले. श्री मुंडे यांनी या भेटीत श्री श्री रविशंकर यांना प्रभू वैद्यनाथांची चांदीची प्रतिमा भेट दिली. राज्यातील २४ जिल्ह्यातील ८६ तालुक्यांमध्ये जलयुक्त शिवार २.० योजना राबविण्यात येणार आहे. बीड सारख्या अवर्षण ग्रस्त जिल्ह्यातील भूजल



पातळी वाढविण्यासाठी याअंतर्गत विशेष प्रयत्न केले जावेत, यादृष्टीने आजच्या बैठकीत चर्चा झाली. यासाठी बीड जिल्ह्यातील ५७ गावांची निवड करण्यात आली आहे. गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार हे अभियान यशस्वी करण्यासाठी एक ॲक्शन प्लॅन तयार केला जावा, असेही धनंजय मुंडे यांनी यावेळी सुचवले. नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन व जनजागृती करण्याबाबतही स्वतंत्र कार्यपद्धती अवलंबण्यात यावी, याबाबतही या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली. राज्य सरकारच्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, स्व.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट) आणि आर्ट ऑफ लिव्हिंग संस्थेची एकत्रित बैठक घेऊन समृद्ध शेतीसाठी आणखी काही निर्णय आगामी काळात घेण्यात येतील, असेही धनंजय मुंडे यावेळी म्हणाले. याप्रसंगी बीड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते वाल्मिक अण्णा कराड, पुणे येथील उद्योजक राज घनवट, नितीन कुलकर्णी, आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रसन्न प्रभू, परळी वैद्यनाथ येथील राजेंद्र सामत, जगदीश मिटकरी, मुकेश भुतडा, अनुप भन्साळी यांसह आदी उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्रातील अनेक सेवेकरी उपस्थित होते, त्या सर्वांची धनंजय मुंडे यांनी व्यक्तिशः भेटून विचारपूस केली.

# माजी सैनिकाच्या उपोषणाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील मौजे शिवणी हद्दीतील गट क्र. ६६२ मधील ताब्यात असलेली गायराण जमिनीवरील घर शेड पाडून लोखंडी पत्रे, अँगल तसेच उपजीविकेच्या वस्तू, साहित्य संसार उपयोगी वस्तू चोरी दरोडा घालून लंपास केल्याप्रकरणी माजी सैनिक प्रकाश वाघमारे यांचे मागील एक महिन्यापासून बेमुदत उपोषण सुरू होते. मात्र प्रशासनाने कसलीही दखल न घेतल्याने २० फेब्रुवारी पासून आमरण उपोषण सुरू केले आहे. मौजे शिवणी हद्दीतील गट क्र.६६२ मधील जमीन अनेक वर्षांपासून माजी सैनिक प्रकाश वाघमारे यांच्या ताब्यात आहे. याठिकाणी ते उपजिविकेसाठी पेरणी करतात. त्यातून मिळणाऱ्या तुटपुंज्या उत्पन्नातून ते आपली उपजीविका करतात. याठिकाणी त्यांनी लोखंडी अँगल असलेले पत्र्याचे शेड घर बांधले होते. मात्र आरोपींनी दोन दिवस गॅस कटर ने पत्र्याचे शेड आणि लोखंडी अँगलने कट केले. शेड घर पाडतानाचे व्हिडिओ उपलब्ध आहेत. त्यामुळे या व्हिडिओद्वारे त्या आरोपींवर कारवाई करण्यासाठी पिंपळनेर पोलीस स्टेशन मध्ये फिर्याद दिली होती. मात्र अद्याप पर्यंत त्या आरोपींवर कसल्याही कारवाई न झाल्यामुळे माजी सैनिक प्रकाश वाघमारे यांनी मौजे शिवणी येथे मागील एक महिन्यापासून बेमुदत उपोषण सुरू केले होते. मात्र आता त्यांनी हे आंदोलन अधिकच तीव्र केलं आहे. २० फेब्रुवारी पासून आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. अन्नत्याग करून उपोषण करत आहेत. तरी देखील अद्याप पर्यंत पोलीस प्रशासन आणि आरोग्य विभागाने या उपोषणाची दखल घेतलेली नाही. उपोषण करणाऱ्या व्यक्तीजवळ.उपोषणस्थळी पोलीस किंवा आरोग्य विभागातील अधिकारी असणे आवश्यक असताना सुद्धा त्याठिकाणी कोणीच आलेलं नाही. देशसेवा करणाऱ्या व्यक्तीला प्रशासनाकडून न्याय मिळत नसल्याने सामान्य नागरिकांतून शासनाच्या विरोधात नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

# तीर्थक्षेत्र विकास योजने अंतर्गत राजेंद्र मस्केंच्या हस्ते भूमिपूजन

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरालगत तळेगाव येथे प्रती वर्षाप्रमाणे याही वर्षी प्रभू विश्वकर्मा यांचा सार्वजनिक जन्मोत्सव सोहळा आज उत्साहात संपन्न झाला. भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के व शांतीनाथ डोरले यांनी जयंती उत्सवात सहभाग घेऊन प्रभू विश्कार्माचे दर्शन घेतले. तसेच तीर्थक्षेत्र विकास योजने अंतर्गत मंजूर एल एडी लाईट कामाचे भूमिपूजन राजेंद्र मस्के यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सरपंच उद्धव घोलप, विश्वकर्मा मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष राजगुरू सर, अरुण पांचाळ, सुभाष घोगरे, राजेश भालेकर, जालना जिल्हाध्यक्ष बाबुराव पांचाळ, रमेश पांचाळ, बापूराव भालेकर कुंडलकर सर, श्री सागर सर, एपीआय राजगुरू सर, राजू पांचाळ, प्रकाश क्षीरसागर यांच्यासह विश्वकर्मा समाजातील प्रतिष्ठित नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.



# परळीत होणाऱ्या ब्राह्मण ऐक्य परिषदेला येणाऱ्या वाहनांना रस्ता रोकोचा अडथळा होणार नाही

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

येत्या २५ फेब्रुवारी रोजी परळी वैजनाथ येथे राज्यस्तरीय ब्राह्मण ऐक्य परिषद होत आहे. या परिषदेसाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून समाज बांधव परळी मध्ये दाखल होणार आहेत. मात्र मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे-पाटील यांनी दि. २४ फेब्रुवारीपासून गावागावात रस्ता रोको आंदोलनाची हाक दिलेली आहे. या अनुषंगाने ब्राह्मण ऐक्य परिषदेचे स्वागताध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी शिष्टमंडळासह आज मनोज जरांगे-पाटील यांची भेट घेतली. यावेळी तुमचा लढा न्याय हक्कासाठी आहे त्याला आमचा पाठिंबा असल्याचे सांगून महाराष्ट्रातून ब्राह्मण ऐक्य परिषदेसाठी परळीत येणाऱ्या वाहनांना रस्ता रोको आंदोलनाचा अडथळा ठरणार नाही असे ठोस आश्वासन मनोज जरांगे-पाटील पाटील यांनी दिले आहे. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून सगेसोयऱ्यांचे आरक्षण देण्याच्या मागणीसाठी मनोज जरांगे-पाटील यांनी पुन्हा एकदा आंदोलनाची हाक दिली आहे. जरांगे-पाटील यांनी राज्य सरकारला मागण्या मान्य करण्यासाठी दोन दिवसांचा अवधी दिला आहे. अन्यथा २४ फेब्रुवारीपासून राज्यभरातील सगळ्या गावांमध्ये एकाचवेळी रास्ता रोको आंदोलनाला सुरुवात होईल असा इशारा दिलेला आहे. या अनुषंगाने राज्यस्तरीय ब्राह्मण परिषदेचे स्वागताध्यक्ष परळीचे माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी शिष्टमंडळासह मनोज जरांगे पाटील यांची आंतरवाली सराटी येथे जाऊन भेट घेतली व त्यांना या ऐक्य परिषदेबाबत सविस्तर माहिती देऊन चर्चा केली.

# शत्रूवर जरब बसवण्यासाठी आरमार महत्त्वाचे होते

**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात स्वराज्य स्थापनेसाठी आणि त्यानंतरही शत्रूवर जरब बसवण्यासाठी आरमाराचे महत्त्व होते. त्या काळात पोर्तुगीज, इंग्रज डच, फ्रेंच यांच्यासह मुघलांवरही जरब ठेवण्यासाठी या आरमाराचे मोठे महत्त्व होते अशी माहिती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यातील आरमार प्रमुख सरखेल कान्होजी आंग्रे यांचे वंशज सरखेल रघुजीराजे आंग्रे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली. यावेळी येसाजी कंक यांचे वंशज रवींद्र कंक, बाजीप्रभू देशपांडे यांचे वंशज संदीप पोतनीस ,प्रा. सत्येंद्र पाटील सर, प्रा.मोराळे सर प्रा. पंजाबराव येडे सर, प्रा.आत्माराम वाव्हळ सर यांच्यासह आदींची उपस्थिती होती. पत्रकार परिषदेत पुढे बोलतांना रघुजीराजे अंग्रे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासाठी अनेक नर विरांनी बलिदान दिले. स्वराज्य उभे करणे एवढाच विचार त्यांच्यासोबत होता. महाराजांसाठी अनेक मंडळी खांद्याला खांदा लावून लढली. यासाठी अनेकांनी आपले बलिदान दिले. त्यामुळेच अटक पासून कटक पर्यंत स्वराज्याचा विस्तार झाला. शिवजन्म हे महाराष्ट्राला पडलेले सुंदर स्वप्न आहे असेही रघोजीराजे अंग्रे यांनी सांगितले. माहिती व्हावी, याबरोबरच महाराजांच्या विचारातून प्रेरणा मिळावी यासाठी आम्ही महाराष्ट्रभर दौरे करणार आहोत. शिवचरित्र हा विषय हत्तीच्या गोष्टी सारखा आहे तो पूर्णपणे समजणार नाही. स्वराज्याच्या विचाराचा मावळा या विचाराने भारावून गेला होता. स्वराज्य फक्त छत्रपती शिवाजी महाराजांसाठी नाही तर आमच्यासाठी आहे. ते आमचे आहे. हा विचार त्याकाळी होता म्हणूनच महाराजांच्या नंतर हा विचार कायम राहिला. त्यानंतरही या विचाराने भारावलेले मावळे तब्बल २७ वर्षे मुघलांच्या विरोधात लढले. जे लोक विचार करतात त्यांच्यावर देश चालतो .व्यापारी आणि लढवय्या आरमाराची मांडणी कशी होती. या संदर्भात आम्ही महाराष्ट्रातील लोकांना माहिती देणार आहोत. देशाचा विचार केला तर आम्ही पश्चिम किनारपट्टीवर आहोत. आमच्या बाजूला समुद्रकिनारा असल्याने शत्रु पक्षापासून बचाव करण्यासाठी आमचे आरमार सक्षम असले पाहिजे. त्यासाठीच महाराजांनी काळाची पावले ओळखून आरमार सक्षम केले. आजही या किनारपट्टीच्या रक्षणाचे महत्त्व आहे. कारण मुख्यतः व्यापार समुद्रमार्गी चालतो. त्याकाळी ही चालत होता. त्यामुळे त्या काळातही आरमाराला महत्त्व होते. व्यापारी या मार्गाने सोने, चांदी, मोती, घोडे आदींची वाहतूक करत, या ठिकाणी इंग्रज फ्रेंच डच पोर्तुगीज यांच्यासह मुघलांचीही नजर होती. त्यामुळेच महाराजांनी आरमार सक्षम करून या शत्रूवर जरब बसवली.

# निवणूक मतदान प्रक्रियेत बदल करा -देशमुख

**बीड । प्रतिनिधी**

एक देश, एक निवडणूक याबाबत अंबाजोगाईत संविधान प्रेमी नागरिक एकवटले आहेत. याप्रश्नी मतदारांतून सातत्याने ईव्हीएम हटाव अशी मागणी जोर धरू लागली आहे. याच प्रमुख मागणीसाठी शहरात ईव्हीएम हटाव कृती समितीच्या वतीने १३ फेब्रुवारी २०२४ पासून बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येत आहे. दिवसेंदिवस या आंदोलनाची व्याप्ती वाढत आहे. बुधवारी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने या आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला. यावेळी आगामी काळात देशांतर्गत होणाऱ्या सर्वच निवडणुका या मतपत्रिकेद्वारे (बॅलेट पेपर) घ्याव्यात अशी मागणी बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांनी केली. शहरात ईव्हीएम हटाव कृती समितीच्या वतीने १३ फेब्रुवारी २०२४ पासून बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येत आहे. दिवसेंदिवस या आंदोलनाची व्याप्ती वाढत आहे. बुधवार, दिनांक २१ फेब्रुवारी रोजी ईव्हीएम हटाव कृती समिती अंबाजोगाई यांच्या बेमुदत धरणे आंदोलनास काँग्रेसने सक्रिय



पाठींबा जाहीर केला. यावेळी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख, सामाजिक कार्यकर्ते ॲड.अनंतराव जगतकर, कॉ.बब्रुवाहन पोटभरे (सीपीएम), प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे, प्रा.डी.जी.धाकडे, लंकेश वैद्य, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सचिव शंभूराजे देशमुख, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष ईश्वर शिंदे, शेख मुख्तार बागवान, प्रविण देशमुख, पत्रकार गजानन वांगीकर, पत्रकार अरीफ भाई आदींसह विविध पक्ष, सामाजिक संघटना यांचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख म्हणाले की, ईव्हीएम मशिनद्वारे निवडणूका न घेता मतपत्रिकेद्वारे (बॅलेट पेपर) निवडणूका घेतल्या जाव्यात, भारतीय लोकशाही ही जगातील सर्वांत मोठी शासनप्रणाली असून ती भारतीय संविधानामुळे यशस्वी झाली आहे. हे लक्षात घेऊन संविधानाचे पावित्र्य जपले पाहिजे, लोककल्याण हेच संविधानाचे प्रमुख लक्ष्य आहे. हे सरकारने लक्षात ठेवले पाहिजे. मतदानाबद्दल सर्वसामान्य जनतेच्या मनात साशंकता आहे. हा संशय दूर होण्यासाठी ईव्हीएम मशीनवर बहिष्कार टाकण्याची भारतीय जनतेतून मागणी होत आहे. आम जनतेच्या मनातील भावनांचा आदर करीत तसेच लोकशाही बळकटीकरणासाठी ईव्हीएम वरील बहिष्कार योग्यच वाटतो. भारतीय लोकशाही आज धोक्यात आली आहे. ती जिवंत ठेवण्यासाठी प्रत्येक निवडणुक ही ईव्हीएम ऐवजी मतपत्रिकेद्वारे (बॅलेट पेपर) झाली पाहिजे. आपण दिलेले मतदान निसंदेह असले पाहिजे, म्हणून मतदान हे मतपत्रिकेद्वारेच (बॅलेट पेपर) झाले पाहिजे. असे जिल्हाध्यक्ष देशमुख यांनी सांगितले. व ईव्हीएम हटाव कृती समिती अंबाजोगाई यांच्या बेमुदत धरणे आंदोलनास काँग्रेस सक्रिय पाठींबा देत असल्याचे देशमुख यांनी जाहीर केले. १३ फेब्रुवारी २०२४ पासून सुरू झालेल्या या बेमुदत धरणे आंदोलनात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष (सीपीएम), शिवसेना (उबाठा), शेतकरी कामगार पक्ष, ॲड.माणिक आदमाने (बीआरएसपी), ॲड.शिवाजी कांबळे (समाजवादी पक्ष), राजेश परदेशी यांच्यासह अनेक संविधानप्रेमी राजकीय पक्ष, पुरोगामी संघटना आणि नागरिक सहभागी झाले आहेत. दिवसेंदिवस या आंदोलनाला जनसमर्थन मिळत आहे. हे विशेष होय. मोदी सरकार सत्तेवर आल्यानंतर प्रत्येक निवडणुकीत झालेले मतदान आणि प्रत्यक्ष मोजणी केलेले मतदान यामध्ये अनेक ठिकाणी तफावत आढळून येत आहेत. या मतमोजणीच्या फरकाबाबत निवडणूक आयोग समाधानकारक स्पष्टीकरण देत नाही, त्यामुळे देशासह राज्यात ही काँग्रेसचे राष्ट्रीय नेते खासदार राहुलजी गांधी, खासदार रजनीताई पाटील, प्रदेशाध्यक्ष आमदार नानाभाऊ पटोले यांच्या मार्गदर्शनाखाली ईव्हीएमच्या विरोधात जनजागृती करून समविचारी पक्ष व संघटना मिळून जनआंदोलन उभे करण्यात येत आहे, सन – २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत विविध ठिकाणी मतमोजणी करताना अनेक अडचणी आल्या, याबाबत मतदारांनी जाहीर तक्रारी देखिल केल्या आहेत. तसेच अनेक ठिकाणी मतांची आकडेवारी जुळलेली नाही. वारंवार मागणी करून ही निवडणूक आयोगाने अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती जनतेला दिलेली नाही. यावरून निवडणुकीत गैरप्रकार झाला असल्याचा संशय आहे. यासाठी 'ईव्हीएम मशीनवर नको, तर मतपत्रिकेद्वारे (बॅलेट पेपर) निवडणुका व्हाव्यात, या मागणीसाठी आम्ही आंदोलन करीत आहोत.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com